वर्ष- १२ | अंक- १५ | मुंबई, मंगळवार,२४ फेब्रुवारी २०२६ ते २ मार्च २०२६ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

PG|2

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

चेहऱ्यावरील तीळ हटवण्याचे आठ घरगुती उपाय

3 → बंदुकीच्या छायेत शांततेची प्रतीक्षा

मुंबईतील रस्ते कामांची पालिका आयुक्तांकडून झाडाझडती ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

वर्गशिक्षकाकडून ४ विद्यार्थीनींवर लैंगिक अत्याचार

नराधम न्यायालयाजवळ पोहोचताच महिलांनी झोडपलं


विद्यार्थीनींच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

दरम्यान, संबंधित शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत यापूर्वीही पालकांनी वारंवार तक्रारी केल्याची माहिती समोर आली आहे. एवढी मोठी संस्था असूनही शाळेत वॉचमन नसल्याचा आरोप पालकांनी केला आहे. शाळा सुटल्यानंतर विद्यार्थी थेट रस्त्यावर पळत सुटतात. शेजारील जिजामाता चौकात मोठ्या प्रमाणात वर्दळ असल्याने लहान-मोठे अपघात घडल्याच्या घटनाही घडल्या आहेत.

याबाबत पालकांनी शालेय प्रशासनाकडे तक्रारी केल्या असल्या तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे श्रीरामपूरसह राज्यभरात संताप व्यक्त केला जात असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

श्रीरामपूर। शहरात शिक्षकी पेशाला काळिमा फासणारी संतापजनक घटना उघडकीस आली आहे. एका शाळेतील वर्गशिक्षकाने चार विद्यार्थिनींवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक माहिती समोर आली असून, या प्रकरणाने शहरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी आरोपी शिक्षकाला तात्काळ अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता त्याला ६ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. या घटनेमुळे संपूर्ण शहरात संतापाची लाट उसळलीये. नराधमाला न्यायालयात नेताना महिलांनी त्याच्या कानशिलात लगावलीये.

मिळालेल्या माहितीनुसार, एका विद्यार्थिनीने घडलेला प्रकार आपल्या कुटुंबीयांना सांगितल्यानंतर या प्रकरणाला वाचा फुटली. त्यानंतर संबंधित



शिक्षकाने आणखी तीन ते चार विद्यार्थिनींसोबत गैरकृत्य केल्याचे समोर आले. या तक्रारीनंतर श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात लैंगिक अत्याचार तसेच पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सचिन गोणारकर असे अटक करण्यात आलेल्या आरोपी शिक्षकाचे नाव असून, पोलिसांनी त्याला तात्काळ गजाआड केले आहे. या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, संबंधित शिक्षकाने यापूर्वीही असे प्रकार केले आहेत का, याची महिला अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात येत आहे.

या घटनेमुळे पालकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, मुलींच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रातच अशा प्रकारची घटना घडल्याने समाजमन हादरले आहे.

महाराष्ट्रातलं असं एक गाव जिथं आंतरजातीय विवाह थाटात लावले जाणार!

अहिल्यानगर। अहिल्यानगर जिल्ह्यातील सौंदाळा ग्रामपंचायतीने जातमुक्त गावाची घोषणा केली आहे.. आमच्या गावात जातींवरुन भेद केला जाणार नाही, आंतरजातीय विवाह थाटात लावले जातील, सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या सोशल मीडियावरील संदेशांना गावकरी थारा देणार नाहीत, असा ठरावच सौंदाळा ग्रामस्थांनी एकमुखाने संमत केलाय.. दरम्यान, याशिवाय जातमुक्तीसाठी आणखी कोण-कोणते निर्णय ग्रामस्थांनी एकमताने मंजूर केले आहेत? सरपंचांना याबाबत काय वाटतं? ते जाणून घेऊयात.. नेवासा तालुक्यातील सौंदाळा गाव नेहमी समाज हिताचे निर्णय घेत असते.. त्यामध्ये शिवी बंदी, विधवा पुनर्विवाह, विद्यार्थी आणि गावाच्या हिताचे वेगवेगळे ठराव सौंदाळा ग्रामपंचायत मार्फत आजवर घेतले गेले आहेत.. याच सौंदाळा गावाने आता जात हद्दपार करण्याचा निर्णय घेतला आहे.. सरपंच शरद आरगडे यांनी ग्रामसभेत जातमुक्त गावचा ठराव मांडला आणि संपूर्ण गावाने या ठरावाला एकमुखी पाठिंबा दिला.. या ठरावानुसार सौंदाळा गावामध्ये यापुढे आंतरजातीय विवाह केले जातील.. जात, पंथ, धर्म, वंशाच्या आधारे कोणताही



भेदभाव केला जाणार नाही.. गावातील सर्व नागरिक समान असून, 'माझी जात-मानव' ही भावना स्वीकारण्यात येत आहे.. सार्वजनिक ठिकाणे, शासकीय योजना, ग्रामपंचायत सेवा, सामाजिक-धार्मिक कार्यक्रम, विवाह, सण-उत्सवात जातिभेद केला जाणार नाही...गावातील कुणीही सोशल मीडियावर जातिभेद करणारे मेसेज करणार नाही आणि तसे आढळल्यास ठरावानुसार संबंधितावर कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद करण्यात आली आहे..

सौंदाळा गावचे सरपंच शरद आरगडे याबाबत बोलताना म्हणाले, "आम्ही ग्रामसभेत जातमुक्त गावाची घोषणा केलीये. ग्रामसभेमध्ये सवानुमते हा ठराव मंजूर झालाय. शाळेत प्रत्येकाने भारत माझा देश आहे, आणि सारे भारतीय माझे बांधव आहेत, ही प्रतिज्ञा म्हटलेली आहे. मात्र, आता दैनंदिन जीवनात पाहिलं तर प्रत्येक जाती-पातीत वाटल्या गेल्याचं चित्र पाहायला मिळतंय. जातीभेद सुरु झालाय, हे कुठेतरी थांबलं पाहिजे. मानव जात ही खरी जात आहे. जरी समाज आरक्षण वगैरे काही विषय असतील, तरी जात कागदापुरती मर्यादित असावी. ती माणुसकीमध्ये नसावी. दैनंदिन जीवन जगताना कुठेही जातीची गरज भासत नाही. एखाद्यावर संकट येतं, तेव्हा कोण कोणाची जात पाहात नाही. अशी परिस्थिती असताना कुठेतरी निवडणूक लागली की जात दिसते. अशा गोष्टी लक्षात येतात तेव्हा वाटतं, उपचारापेक्षा प्रतिबंध बरा. गावप्रमुख म्हणून आपली ती जबाबदारी आहे. त्यामुळे आम्ही आधी ग्रामस्थांची चर्चा केली. ग्रामसभेत हाच विषय ठेवला होता.

नेवासा तालुक्याचे आमदार विठ्ठल लंघे याबाबत बोलताना म्हणाले, संपूर्ण राज्याला दिशादर्शक असा निर्णय नेवासा तालुक्यातील आमच्या सौंदाळा ग्रामपंचायतीने घेतलाय. जातमुक्त गाव आम्हाला करायचं आहे. पूर्वीच्या रुढी-परंपरा चालत आल्या होत्या. नवीन पिढीने त्याला फाटा दिलेलाच आहे. सर्वांनी एकत्र येऊन प्रगतीकडे जावं, यासाठी हे घेतलेले निर्णय आहेत. सर्वांना समान न्याय मिळाला पाहिजे, हीच भावना आहे.

पुण्यात इलेक्ट्रिक बसला भीषण आग... सुदैवाने जीवितहानी टळली



पुणे। पुण्याच्या चाकण औद्योगिक वसाहतीत शुक्रवारी दुपारी ह्यपीएमपीएमएलह्णच्या एका धावत्या इलेक्ट्रिक बसला भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली. निगडीहून महाळुंगे एमआयडीसीकडे कामगारांना घेऊन जाणाऱ्या या विशेष बसमध्ये साधारण ५० प्रवासी प्रवास करत होते. महिंद्रा कंपनीसमोरून ही बस जात असताना अचानक बसच्या मागील भागातून धूर निघू लागला आणि काही क्षणांतच ज्वाळा उसळू लागल्या. सुदैवाने, बसचालकाने तत्काळ प्रसंगावधान राखत बस रस्त्याच्या कडेला थांबवली आणि वाहकाच्या मदतीने सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे खाली उतरवले, त्यामुळे मोठी जीवितहानी टळली.

शॉर्ट सर्किट किंवा बॅटरी यंत्रणेतील बिघाडामुळे ही आग लागली असावी, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि जवानांनी आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न केले, मात्र तोपर्यंत ही लाखो रुपयांची बस पूर्णपणे जळून खाक झाली होती. काही प्रवाशांना धुरामुळे थोडा त्रास झाला असला तरी, कोणालाही गंभीर दुखापत झालेली नाही. या घटनेमुळे चाकण परिसरातील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती, त्यानंतर पोलिसांनी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

दरम्यान, या घटनेने सार्वजनिक वाहतुकीच्या सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. गेल्या वर्षभरात पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात 'पीएमपीएमएल' बसेसना आग लागण्याच्या किमान १० ते १२ घटना समोर आल्या आहेत. कधी इंजिन गरम होणे तर कधी बॅटरीमधील बिघाड ही कारणे प्रशासनाकडून दिली जातात, परंतु प्रवाशांचा जीव धोक्यात घालणाऱ्या या तांत्रिक चुकांना जबाबदार कोण, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. प्रशासनाचा देखभाल-दुरुस्तीचा अभाव की कंत्राटदारांचा निष्काळजीपणा, यावरून संताप व्यक्त केला जात आहे.

ठाकरे गटाच्या उप-तालुकाप्रमुखाच्या शेतात अफूची शेती



धाराशिव। धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उपतालुकाप्रमुखाने कांदा पिकामध्ये बेकायदेशीररीत्या अफूची लागवड केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी केलेल्या कारवाईत ४८५ किलो ६५० ग्रॅम वजनाची अफूची झाडे जप्त करण्यात आली असून, याची अंदाजे किंमत ७२ लाख ८४ हजार ७५० रुपये इतकी आहे. दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी वाशी तालुक्यातील मौजे दशमेगाव शिवारात एका शेतात लपूनछपून अफूची लागवड करण्यात आल्याची गोपनीय माहिती पोलिसांना प्राप्त झाली होती. त्यानुसार पोलीस अधीक्षक रितू खोखर यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तात्काळ कारवाईचे आदेश दिले.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सर्व्हे क्रमांक १६३, मौजे दशमेगाव येथे पाहणी केली असता कांदा पिकाच्या आंतरपिकामध्ये मोठ्या प्रमाणात अफूची लागवड आढळून आली. सदर अफूच्या झाडांना पांढऱ्या व गुलाबी रंगाची फुले तसेच मोठी बोंडे असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. हे शेत समाधान मनोहर उघडे (रा. दशमेगाव, ता. वाशी, जि. धाराशिव) यांचे असल्याचे निष्पन्न झाले असून, आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी त्यांनीच ही लागवड केल्याची माहिती पोलिसांना दिली. नायब तहसीलदार वाशी व दोन शासकीय पंचांच्या उपस्थितीत ही अफूची झाडे जप्त करण्यात आली. या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४५/२०२६ अन्वये एनडीपीएस कायदा १९८५ कलम ८ (क) व १८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार व वाशी पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

ओमराजे निंबाळकरांच्या भूमिकेकडे लक्ष

धाराशिवचे ठाकरे गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर हे गेल्या काही काळापासून जिल्ह्यात अवैध व्यवसाय, दोन नंबरचे धंदे आणि समाजविघातक प्रवृत्तींच्या विरोधात सातत्याने आक्रमक भूमिका घेताना दिसत आहेत. विशेषतः तुळजापूर येथील भाजपाचे पदाधिकारी व तत्कालीन नगराध्यक्ष विनोद उर्फ पिंटू गंगणे यांच्या कथित ड्रग्जप्रकरणातील सहभागावरून ओमराजे निंबाळकर यांनी जाहीरपणे तीव्र विरोध दर्शवला होता. त्या वेळी त्यांनी आपल्या भाषणांत सांगितले होते की, दोन नंबर काम करणाऱ्या, समाजविघातक कृत्यांमध्ये सहभागी असणाऱ्यांना राजकारणात स्थान देऊ नका. आम्ही फक्त स्वच्छ चारित्र्याच्या लोकांनाच राजकारणात सोबत घेतो. मात्र आता त्यांच्याच पक्षाच्या वाशी उपतालुकाप्रमुखाच्या शेतात मोठ्या प्रमाणात अफूची शेती आढळून आल्याने राजकीय वर्तुळात तीव्र चर्चा सुरू झाली आहे. एकीकडे अवैध व्यवसायांविरोधात ओमराजे निंबाळकर रान उठवत असतानाच, दुसरीकडे त्यांच्या पक्षातील पदाधिकाऱ्यावर इतका गंभीर गुन्हा उघडकीस आल्याने या प्रकरणात ओमराजे निंबाळकर काय भूमिका घेतात, पक्षांतर्गत कोणती कारवाई होते, याकडे संपूर्ण धाराशिव जिल्ह्याचे विशेषतः वाशी तालुक्याचे लक्ष लागले आहे.



मशरुम्सची भाजी



साहित्य : मशरुम - २०० ग्रॅम, कांदा - १ मध्यम आकाराचा, तिखट - १ चमचा, हळद - १/२ चमचा, मीठ - चवीनुसार, जिरे - १ छोटा चमचा, तेल - फोडणीसाठी, आले-लसूण पेस्ट - १ छोटा चमचा, थोडी कोथिंबीर.

पाककृती : कांदा, कोथिंबीर बारीक चिरून घ्या. मशरुम्स उभे पातळ कापून घ्या. फोडणीसाठी तेल गरम करून जिरे, आले-लसूण पेस्ट, कांदा घालून परतून घ्या. कांदा थोडा शिजल्यावर मशरुम्स घालून परतून घ्या. नंतर हळद आणि तिखट घाला. झाकण ठेवून २ मि. शिजू द्या. या वेळात मशरुम्सना पाणी सुटेल, मग मीठ व कोथिंबीर घालून, गॅस मध्यम आचेवर ठेवून हे पाणी आटेपर्यंत शिजू द्या.

चेहऱ्यावरील तीळ हटवण्याचे आठ घरगुती उपाय

चेहऱ्यावरचा एखादा तीळ ब्यूटीमार्क असू शकतो. परंतु, चेहऱ्यावर अधिक तीळ असल्यास किंवा त्यांची जागा चुकीची असल्यास ते खटकतात. शरीरावरील तीळ काढून टाकण्यासाठी काही डर्मेटोलॉजिक ट्रीटमेंट आहेत, परंतु घरगुती उपायांनीदेखील तीळ हटवले जाऊ शकतात, हे तुम्हाला ठाऊक आहे का?



▌कपभर अननसाचा रस आणि पाव कप सैंधव मीठ एकत्र करा. या मिश्रणाने स्क्रब केल्यास चेहऱ्यावरील तीळ कमी होण्यास मदत होईल.

▌लसणाची पेस्ट रात्री झोपण्यापूर्वी तिळावर लावा. त्यावर बॅण्डेज लावा. सकाळी उठल्यावर त्वचा कोमट पाण्याने स्वच्छ धुवा. हा प्रयोग नियमित केल्यास तिळाचा त्रास कमी होण्यास मदत होईल.

▌काही आल्याचे तुकडे ठेचून तिळाच्या जागी लावा. त्यावर कपडा बांधून झोपा. या उपायानेही तीळ कमी होण्यास मदत होते.

▌व्हिटॅमिन सीची एक गोळी बारीक कुटा. रात्री ही पेस्ट तिळावर लावून, त्यावर बॅण्डेज लावून झोपा.

▌व्हिनेगरचा वापर करूनदेखील तीळ हटवला जाऊ शकतो. सुरुवातीला चेहरा गरम पाण्याने धुवा. कापसाच्या बोळ्याने व्हिनेगर तिळावर लावा. १० मिनिटांनंतर चेहरा गरम पाण्याने स्वच्छ धुवावा.

▌कोथिंबीरच्या काही पानांची पेस्ट करा. ही पेस्ट काही दिवस तुम्हांला नको असलेल्या तिळावर नियमित लावा.

▌एरंडेल तेलाच्या मॉलिशमुळेदेखील तिळापासून सुटका मिळू शकते. हळूहळू तीळ कमी होण्यास सुरूवात होईल.

▌मध आणि सूर्यफूलाच्या बीयांच्या तेलाचे मिश्रण करा. या मिश्रणाचा तीळावर पाच मिनिटं मसाज करा. यामुळे त्वचा तजेलदार होईल सोबतच तिळ कमी होण्यास मदत होईल.



मधुमेह आणि फळे

मधुमेह हा आजार असलेल्या व्यक्तींनी आहाराबाबत सजग राहणे आवश्यक असते. फळांचे सेवन करताना काळजी घेतली पाहिजे, अन्यथा या फळांच्या सेवनाने रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू शकते. बऱ्याच जणांचा असा गैरसमज असतो की फळांमध्ये नैसर्गिक साखर असल्याने रक्तातील साखर वाढत नाही. फळे सेवन केलेली चालतात, असे मानून मधुमेहाचे रुग्ण फळांचे सेवन करतात. पण फळांमध्ये असलेली नैसर्गिक साखर हानीकारक ठरू शकते.



चेरी : चेरीमध्ये खूप जास्त साखर असते, त्यामुळेच आईस्क्रीम आदी गोष्टी तयार करण्यासाठी चेरीचा वापर केला जातो. एका चेरीमध्ये सुमारे ८ ग्रॅम साखर असते, त्यामुळे चेरीचे सेवन करताना काळजी घेतली पाहिजे आणि विशिष्ट प्रमाणातच चेरीचे सेवन केले पाहिजे. चेरीच्या सेवनाने रक्तातील शर्करेची पातळी वाढू शकते.

आंबा : आंबा हा वर्षातून एकदाच मिळणाऱ्या फळांपैकी एक आहे आणि बहुतेकांना आंबा खूप आवडतो. परंतु त्यातही नैसर्गिक साखरेचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांनी आंब्याचे सेवन करणे शक्यतो टाळले पाहिजे. सर्वसाधारणपणे एका आंब्यामध्ये ४५ ग्रॅम इतकी नैसर्गिक साखर असते.

द्राक्षे : रक्तातील साखरेची पातळी योग्य राखायची असेल, तर द्राक्षांचे सेवन करणे टाळावे. कारण द्राक्षही गोड असतात. एक कप द्राक्षांतून शरीरात २३ ग्रॅम साखर जाऊ शकते.

लिची : हे फळही जास्त साखरेचे प्रमाण असलेल्या फळांपैकी एक आहे. त्यामुळे रक्तातील साखर वाढू शकते. एक कप लिची फळांमध्ये २९ ग्रॅम एवढी नैसर्गिक साखर असते.

डाळिंब : डाळिंब रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण वाढवते, परंतु त्यातही साखरेचे प्रमाण अधिक असल्याने त्याचे सेवन केल्यास मधुमेही रुग्णांमध्ये रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू शकते. एका साधारण आकाराच्या डाळिंबामध्ये ३९ ग्रॅमपर्यंत साखर असते. मधुमेही रुग्णांनी डाळिंबाचे सेवन टाळले पाहिजे.

मधुमेही रुग्णांनी वरील फळे टाळावी तसेच कोणतेही इतर फळ सेवन करताना विशिष्ट प्रमाणातच सेवन करावे, जेणेकरून रक्तशर्करेचे प्रमाण योग्य राहील. मधुमेही रुग्णांना रक्तातील साखर कमी होऊ द्यायची नसते, तशीच ती वाढूनही उपयोग नाही, त्यामुळे ठरावीक वेळेला आहार सेवन करतानाही तो योग्य प्रमाणात सेवन केला पाहिजे.

व्यायामानंतर खाज येत असल्यास...

खाज येण्याच्या समस्येला प्रुराईटस देखील म्हटले जाते. व्यायामादरम्यान खाज आल्याने त्वचेच्या पेशींना त्रास होतो किंवा इरिटेशन होते. सर्वसाधारणपणे अचानक तापमानात झालेले बदल, संसर्ग किंवा सौंदर्यप्रसाधनांची प्रतिक्रिया यामुळे हे होते. काही व्यक्तींमध्ये प्रतिकारशक्ती कमजोर असल्यास ही लक्षणे दिसतात. अशाच प्रकारे जेव्हा आपण वेगात चालतो तेव्हा किंवा थंड जागेवरून गरम जागी जातो आणि थोडे श्रम करतो, तेव्हा खाज येऊ शकते. शरीरातील नसांमध्ये प्रुरिसेप्टर्स असतात. जेव्हा वातावरणात अचानक बदल होतो किंवा त्वचेवर कोणतीही रासायनिक प्रतिक्रिया दिसते, तेव्हा हे प्रुरिसेप्टर्स कार्यान्वित होतात आणि मेंदू आणि मणका यांना संकेत पाठवतात. त्या संकेताऐवजी मेंदू शरीरात अशा प्रकारच्या रसायनांची निर्मिती सुरू करतो जी या शारीरिक अवस्थेशी निपटण्यासाठी आवश्यक असते. शरीराची ही प्रतिक्रिया समजण्यासाठीच खाज येण्याची समस्या सुरू होते. शरीरांतर्गत रसायनांमुळेही पित्ताची समस्या निर्माण होते.

खाज कशी दूर करावी?

■ व्यायामादरम्यान किंवा वेगाने चालताना किंवा अतिश्रम केल्यास शरीराला खाज येत असल्यास व्यायाम आणि श्रमाचे काम ताबडतोब थांबवा. एखाद्या उष्ण जागी असाल तर थंड जागी जाऊन थांबा. अशा परिस्थितीत हिवाळ्यापासून बचाव करण्यासाठी उबदार कपडे घातले असतील तर तेही काढून टाका आणि शरीराचे तापमान सर्वसामान्य कसे करता येईल यासाठी प्रयत्न करा. सतत खाज येत असेल तर वैद्यकीय सल्ला अवश्य घ्यावा.

■ थंडीमुळे होणाऱ्या पित्ताने वैतागला असाल तर थंड पाण्याचा शेक घ्या. त्यामुळे रक्तवाहिन्या संकुचित होतात आणि हिस्टामिन या रसायनांचे अतिरिक्त वहन थांबवण्यास मदत करते. त्याचबरोबर पित्तामध्ये खाज येत असेल तर त्यावर उपाय म्हणून अर्धा कप दलिया पाण्याच्या टबात टाकून त्याने स्नान करावे.

■ याखेरीज एका वाटीत २ चमचे बेकिंग सोडा घ्यावा आणि त्यात पुरेसे पाणी मिसळावे. ही पेस्ट करून खाज येणाऱ्या जागी लावावी तसेच जिथे पित्त उठले आहे त्यावरही लावावे.



व्हॉट्सॲप स्टेट्समध्ये शेअर करा एचडी फोटो आणि व्हिडीओ! आलं नवीन

व्हॉट्सॲपने एचडी फोटो आणि व्हिडीओ शेअरिंगचा अपडेट दिला आहे. आता व्हॉट्सॲप फोटो आणि व्हिडीओ स्टेट्समध्ये देखील क्वालिटी न बिघडवता शेअर करता येईल. हे फीचर अँड्रॉइड बीटा व्हर्जन २.२३.२६.३ मध्ये उपलब्ध आहे.

व्हॉट्सॲपने अलीकडेच हाय डेफिनिशन म्हणजे एचडी क्वालिटीमध्ये फोटो आणि व्हिडीओ शेअरिंगचा अपडेट दिला होता. त्यानंतर आता व्हॉट्सॲप एक नवीन अपडेटमधून एचडी फोटो व्हिडीओ स्टेट्स अपडेट करण्याचा ऑप्शन देत आहे. म्हणजे तुम्ही एचडी फॉर्मेटमध्ये फोटो आणि व्हिडीओ आपल्या व्हॉट्सॲप स्टेट्सवर शेअर करू शकाल. सध्या स्टेट्समध्ये फोटो आणि व्हिडीओ शेअर केल्यावर त्याची क्वालिटी खराब होते. परंतु आता व्हॉट्सॲप फोटो व्हिडीओ शेअर केल्यावर त्यांची क्वालिटी खराब होणार नाही.

बीटा टेस्टरसाठी लाइव्ह झालं फीचर

नवीन एचडी फोटो आणि व्हिडीओ शेअरिंग फीचर अँड्रॉइड बीटा व्हर्जन २.२३.२६.३ साठी सादर करण्यात आलं आहे. यात जेव्हा तुम्ही व्हॉट्सॲप स्टेट्स शेअर कराल, तेव्हा तुम्हाला एचडी आयकॉन दिसेल, ज्याच्या मदतीने एचडी फोटो आणि व्हिडीओ स्टेट्स शेअर करता येतील. व्हॉट्सॲपच्या एचडी स्टेट्सची सुविधा बीटा व्हर्जनमध्ये उपलब्ध आहे. सध्या याचा वापर बीटा टेस्टर करू शकतात. परंतु लवकरच हे फीचर सामान्य युजर्ससाठी उपलब्ध होईल, अशी अपेक्षा आहे.



'या' चुका टाळल्या तर लग्नात वधूचा मेकअप होणार नाही खराब!



घरात लग्नकार्य असलं की कामाची नुसती लगबग सुरू असते. धावपळ, धांदल असा सगळा माहोल असतो. मात्र अशा वातावरणातही एक आनंद, उत्साह असतो. लग्न म्हणजे दोन जिवांचंच नव्हे तर दोन कुटुंबांचं मीलन असतं. त्यामुळे हा दिवस घरातल्या प्रत्येकासाठी खास असतो. त्यातच वधू-वरांचा थाट तर काही औरच असतो. प्रत्येकाचं लक्ष या दोघांकडेच वेधलेलं असतं. लग्नात आलेल्या पाहूण्यांच्या नजरा, कॅमेरा हे जणू वधू-वरांकडेच केंद्रित झालेले असतात. त्यामुळे लग्नात सुंदर दिसण्यावर या दोघांचाही भर असतो. त्यातच वधू असेल तर विचारायलाच नको. अगदी साड्यांपासून मेकअपपर्यंत प्रत्येक गोष्ट खास असण्यावर तिचा भर असतो. मेकअपमुळे सौंदर्यात भर पडतेच. मात्र बऱ्याच वेळा उत्तम प्रतीच्या मेकअपचं सामान वापरूनही तो मेकअप नीट सेट होत नाही किंवा ऐनवेळी तो खराब दिसून लागतो. हे असं का होतं यामागे बरीच कारणं आहेत. यामध्ये आपल्या बदललेल्या जीवनशैलीचादेखील समावेश आहे.

हेअर कलर : बदलत्या काळानुसार रोज नवनवी ट्रेंड बाजारात येत असतात. सध्या तरुणाईमध्ये हेअर कलर करण्याची क्रेझ दिसून येत आहे. त्यामुळे बऱ्याच तरुणी वेगवेगळ्या रंगांनी केस कलर करत असतात. पण काही वेळेस उत्सुक होऊन केलेला हेअर कलर त्यांचा चेहऱ्याला शोभून दिसत नाही. त्यामुळे लग्नासाठीचा लुक खराब होऊ शकतो. हेअर कलर व्यवस्थित सेटल होण्यासाठी १० ते १५ दिवस लागतात. त्यामुळे लग्नाच्या ४ ते ५ दिवस आधी हेअर कलर केल्यास जो लूक आपल्याला अपेक्षित आहे तो मिळणार नाही. म्हणूनच लग्नापूर्वी जर केस कलर करायचे असतील तर निदान महिनाभर आधी कलर करावेत.

हेअरकट : हेअर कलरप्रमाणे हेअरकट देखील लग्नाच्या ४-५ दिवस आधी करू नये. कधी कधी हेअरकट आपल्याला हवा तसा होतं नाही किंवा तो ब्रायडल लूकला साजेसा नसतो. त्यामुळे लग्नात हेअरस्टाइल करताना अडचणी येऊ शकतात. त्यामुळे महिनाभर आधी हेअरकट केल्यास ते चांगले ठरते.

लग्नापूर्वी सुंदर दिसण्यासाठी केलेले उपाय : लग्नात सुंदर दिसावं ही प्रत्येक तरुणीची इच्छा असते. त्यामुळे बऱ्याच वेळा मुली फेशिअल, ब्लिच, क्लीनअप असे नानाविध प्रकार करतात. पण लग्नाच्या ४-५ दिवसआधी ब्यूटी ट्रीटमेंट करणं नुकसानदायक ठरत. कारण काही मुलींची स्कीन सेन्सिटीव्ह असते, काहींची ड्राय तर काहींची ऑइली असते. त्यामुळे अशा त्वचेसाठी वेगवेगळ्या ब्युटी ट्रीटमेंट असतात. मात्र काही वेळा योग्य प्रोडक्ट किंवा क्रीम न वापरल्यामुळे त्याचा परिणाम चेहऱ्यावर होऊ शकतो. चेहऱ्यावर लाल पूरळ किंवा पुटकुळ्या येऊ शकतात.

अतिरिक्त व्यायाम : लग्नात बारीक दिसावं याकडे मुलींचा जास्त कल असतो. त्यामुळे मुली बऱ्याचदा लग्नापूर्वी डाएट, व्यायाम करतात. तसंच लग्नाच्या १०-१२ दिवस आधी हार्ड वर्कआऊट करतात. परंतु यामुळे त्या थकतात आणि सोबतच चेहरा ही अगदी फिका पडतो.

फास्ट फूड खाणे : लग्नात मेकअपमुळे तर आपलं सौंदर्य वाढतंच मात्र त्याचप्रमाणे चेहऱ्यावर तजेला असणंही गरजेचं आहे. तजेला असेल तरच सौंदर्यात भर पडते. नितळ आणी सतेज चेहरा हवा असेल तर आपल्या आहाराकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. या काळात फास्ट फूड खाणं कमी करावं आणि पौष्टीक पदार्थ खाण्यावर भर द्यावा. फास्ट फूड खाल्यामुळे बऱ्याचदा चेहऱ्यावर पिंपल्स येण्याची शक्यता असते. त्यामुळे शक्यतो फास्ट फूड टाळावे.



अनशापोटी करा गुळाचे सेवन



रक्तदाब नियंत्रणात राहातो : रक्तदाब नियंत्रणासाठी गूळ प्रभावी ठरतो. गुळामध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शिअम आणि फॉस्फरस आढळते. हे हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक आहेत. गुळाबरोबर आले सेवन केल्यास सांधेदुखीपासून मुक्ती मिळते.

रक्त साफ होते : सकाळी अनशापोटी गूळ खाऊन कोमट पाणी प्यायल्यास रक्त स्वच्छ होते. त्यामुळे नवीन रक्त तयार होते. हृदयरोग होण्याचा धोका दूर ठेवण्यासही गुळाच्या सेवनाचा फायदा होता.

शरीराला मिळते ताकद : गुळाच्या नियमित सेवनाने शरीर ताकदवान होते. दिवसभराचा थकवा दूर होण्यासही मदत होते. शरीरात ऊर्जा पातळी कायम राहाते आणि ती कमी होत नाही.

पचनसंस्था मजबूत होते : ज्या लोकांना आहार सहजपणे पचवण्यात अडचणी येतात त्यांनी गूळ आणि गरम पाणी सेवन करावे. या व्यक्तींसाठी ते औषधासारखे कामकरते. त्याचबरोबर बद्धकोष्ठता, पोटात वायू होणे, ॲसिडीटीसारख्या समस्यांपासून सुटका होण्यास मदत होते.

Public Notice

This is to inform the general public that the following flats, located at Rajaram Co-operative Housing Society Ltd. (Regd No. TNA/(TNA)/HSG/TC/ 11314/1999-2000, dated 25/02/2000), Bunderwadi, Navghar Road, Near Railway Station, Bhayandar (East), District Thane 401105, owned by 1) Mr. Jitendra Harisingh Thakur and Rajendra Harisingh Thakur for Shop No. 2 and 2)Mr. Pravin Ramchandra Patil for Flat No.301 and 3) Mr. Puthiyaduthu thotumkara jayraj and Nitin Jayraj for Flat No.304 , were purchased by our clients Mr. Deepak Moreshwar Naik on 29.10.1996 and 08.12.2003 and 14.05.2005, respectively.

The original registered sale deed documents related to these flats were lost on 27.11.2025 at around 2:00 PM while traveling by auto-rickshaw on Navghar Road, Bhayandar (East), District Thane.

Details of the properties are as follows:

Annexure

Village	Survey No. (Old)	Survey No. (New)	Part No.	Shop /Flat No.	Area (Sq. Ft.)	Name
Khari	149	11	Part I	02	230 sq. ft.	Mr. Deepak Moreshwar Naik
Khari	149	11	Part I	301	530 sq. ft.	Mr. Deepak Moreshwar Naik
Khari	149	11	Part I	304	530 sq. ft.	Mr. Deepak Moreshwar Naik

The transaction for the above properties has been completed. If anyone has any claims, rights, or objections regarding these properties, such as agreements, sale deeds, mortgages, inheritance, gifts, donations, leases, liens, exchanges, easements, or any other rights or interests, they must submit their written objections along with supporting documents to the undersigned, acting as the advocate for the purchasers, within 14 (fourteen) days of the publication of this notice.

If no objections are received within the stipulated time, it will be assumed that there are no claims or objections regarding the said properties, and the transaction will be considered legally complete. Any objections raised after the specified period will not be binding on our clients. The public is requested to take note of this.

Date: 19.02.2026

Signed:
Advocate Sanjit Tarakant Mishra
(Purchaser Advocate)
Mobile: 9867032590 / 9320155624

Office Address:
Shop No. 14, Sonag Ganga Co-op Housing Society,
Near Golden Nest Bus Stop, Mira-Bhayandar Road,
Mira Road (East), District Thane 401107

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार,२४ फेब्रुवारी २०२६ ते २ मार्च २०२६

संपादकीय

बंदुकीच्या छायेत शांततेची प्रतीक्षा



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



मणिपूरमधील उखरूल जिल्ह्यात नागा आणि कुकी यांच्यामध्ये या आठवड्यात झालेला हिंसाचार ही खूप मोठी धोक्याची सूचना आहे. मैतेई आणि कुकी यांच्या संघर्षात नागा गटांना ओढले गेले तर मग त्याचा दूरगामी परिणाम त्रिजातीय संघर्षात किंवा धार्मिक संघर्षात होऊ शकतो. त्यातून ईशान्य भारत हे वंशिक हिंसाचाराचे केंद्रबिंदू ठरू शकते. मणिपूरमध्ये ३ मे २०२३ नंतर हिंसाचाराची घटना घडली नाही असा एकही महिना गेलेला नाही. जमीन आणि संसाधने यांवरील नियंत्रणावरून सुरू झालेला संघर्ष आता दीर्घकालीन अशांततेकडे जाईल की काय, अशी भीती निर्माण झालेली असतानाच नव्याने स्थापन झालेल्या सरकारमुळे शांततेची काही आशा आहे का, हे तपासण्यासाठी नजीकच्या इतिहासात डोकवायला हवे.

'सरहद' संस्थेच्या माध्यमातून मणिपूरशी आमचा नियमित संपर्क आहे. तेथील मैतेई समाजाचे २४ विद्यार्थी सरहद संस्थेने शिक्षणासाठी दत्तक घेतले. त्यानंतर कुकी आणि नागा मुलींच्या शिक्षणासाठी सरहद संस्थेने राज्य आणि केंद्र सरकारकडे प्रस्ताव दिला तेव्हा सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सध्या आम्ही या प्रस्तावाला सहकार्य करणार नाही कारण डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांची पोलिस पडताळणी शक्य नाही, त्या भागातील नोंदी उपलब्ध नाहीत, अशी कारणे दिली. त्यावेळी पहिल्यांदा परिस्थिती कोणत्या दिशेला चालली आहे, याचा अंदाज आला. इम्फाळ खोऱ्यात राहणारे मैतेई आणि डोंगराळ भागात राहणारे कुकी यांच्यातील वंशिक संघर्षामुळे ३ मे २०२३ रोजी अनुसूचित जमातीचा दर्जा मिळवण्यासाठी निघालेल्या मैतेई समुदायाच्या मोर्चाने गंभीर वळण घेतले आणि हिंसाचाराचा भडका उडाला, तो आजवर धुमसतोच आहे. एका स्वयंसेवी संस्थेच्या अहवालानुसार या हिंसाचारात ८००हून अधिक लोक बळी पडले, तर एक लाखांपेक्षा अधिक लोक स्थलांतरित झाले. ६०० पेक्षा अधिक धार्मिक स्थळे पाडण्यात आली. शेकडो घरे जाळण्यात आली. या हिंसाचारामागे सरकारमधील सत्तापक्ष असल्याचा संशयातून त्याची मोठी प्रतिक्रिया उमटली. खरं तर मणिपूरमध्ये अशा प्रकारच्या वांशिक संघर्षाला मोठी पार्श्वभूमी आहे. १९५६ साली मणिपूरला केंद्रशासित प्रदेश केल्यापासून छोट्या-मोठ्या प्रमाणात असे संघर्ष होतच होते. अगदी शेवट भारतीय जनता पक्षाची सत्ता येण्यापूर्वी ओकराम इबोबी सिंह यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसशासित मणिपूर सरकारने नव्या सात जिल्ह्यांची घोषणा केली. ओकराम इबोबी सिंह हे मैतेई समाजाचे नेते. त्यांच्यावरही अनेकदा दहतशवाद्यांनी हल्ला केला होता. तिथला मैतेई समाज मुख्यतः हिंदू असून श्रीकृष्णाचे भक्त आहे, तर नागा आणि कुकी या आदिवासी जमातींमध्ये मुख्यतः ख्रिश्चन धमार्चा प्रभाव आहे. नवीन सात जिल्हे करण्याच्या इबोबी सिंह यांच्या घोषणेमुळे मणिपूरमध्ये विद्वेषाची ठिणगी पडली. हिंसाचार सुरू झाला. नाकाबंदी करून बस जाळणे, सरकारी वाहनांचे आणि मालमत्तेचे नुकसान करणे यांसह काही ठिकाणी तर निरपराध नागरिकांवर हल्ल्याचेही प्रकार घडले. त्या काळात सत्ता मिळविण्यासाठी जी चूक काँग्रेसच्या नेत्यांनी केली त्याला भारतीय जनता पक्षाच्या काही नेत्यांनीही धुमसत ठेवण्यास अप्रत्यक्ष हातभार लावला. दरम्यानच्या काळात केंद्र सरकारने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने ईशान्य भारतात, मुख्यतः नागालँड, मणिपूर मध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी ३ ऑगस्ट २०१५ रोजी नागा बंडखोर गटांबरोबर शांतता करार केला. यातून वांशिक संघर्षातून नागा काही प्रमाणात बाजूला झाले, मात्र या कराराची नीट अंमलबजावणी होऊ शकली नाही. दुसरीकडे कुकी आणि मैतेई यांच्यामधील परिस्थिती हळूहळू अधिकच गुंतागुंतीची झाली. मणिपुरात मैतेईची लोकसंख्या अधिक असून ते बहुतांश पठारांवर राहतात, तर ९० टक्के कुकी आणि नागा हे डोंगराळ भागात राहतात. सरकार आणि नोकरशाहीमध्ये मैतेई समुदायाचे वर्चस्व असल्याने नव्या सात जिल्ह्यांची घोषणा ही कुकी आणि नागाबहुल भागांवर अतिक्रमण करण्याचे षडयंत्र आहे, या समजातून कुकी आणि नागा समूहाने त्या काळात रस्ते बंद करून आर्थिक नाकाबंदी केली होती. त्यानंतर नागा विरुद्ध मैतेई आणि मैतेई विरुद्ध कुकी असेही संघर्ष झाले. त्याकाळात माजी केंद्रीय मंत्री मोहन धारिया आणि पुण्यात असणारे नागालँडचे निवृत्त मुख्य सचिव अच्युत गोखले यांच्या सहकार्याने आम्ही काही कुकी आणि नागा गटांशी बोलणी करण्यासाठी पुढाकार घेतला, मात्र लष्कराने या संवेदनशील भागात जरुरीपेक्षा जास्त बळाचा वापर करणे राष्ट्रहिताचे नसल्याने संवादातून मार्ग काढावा, असा गोपनीय अहवाल केंद्रीय गृहमंत्री पी. चिदंबरम यांना दिल्याचे त्यांनी मोहन धारिया यांना सांगितले. पुढे २०१७ साली झालेल्या मणिपूरच्या निवडणुकीत काँग्रेसला ६० पैकी २८ आणि भाजपला २१ जागांवर विजय मिळाला. काँग्रेसकडे अधिक जागा असूनही भाजपने स्थानिक छोट्या पक्षांशी संधान बांधून मणिपूरमध्ये सत्ता स्थापन केली. सामान्यपणे मणिपूरसारखे छोटे राज्य केंद्र सरकारच्या सहकार्याशिवाय चालणे अवघड असते. त्यातच पहिल्यांदा भाजपची सत्ता आली आणि एन. बिरेन सिंह मुख्यमंत्री झाले. बिरेन सिंह मैतेई समाजाचे असल्याने त्यांनी मैतेईना झुकते माप देण्यास सुरुवात केली. दरम्यान, पुन्हा २०२२ सालच्या निवडणुकीत भाजपाने ६० पैकी ३२ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले. मैतेईना आदिवासींचा दर्जा देऊन डोंगराळ भागातील जमिनी मैतेईना देण्याचा मुख्यमंत्री बिरेन सिंह प्रयत्न करत आहेत, अशा समजातून मैतेई आणि कुकी या समुदायांमध्ये पुन्हा संघर्ष झाला आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे २ मे २०२३ पासून उसळलेल्या हिंसाचाराने शेकडो लोकांचे बळी घेतले, अनेक महिलांवर अत्याचार झाले. सरकारी मालमत्तेचे मोठे नुकसान झाले. एका संवेदनशील सीमावर्ती राज्यातील हा हिंसाचार एन. बिरेन सिंह यांना नियंत्रित करता आला नाही. त्यांच्याच पक्षाच्या कुकी आमदारावर जीवघेणा हल्ला झाला, स्वतः बिरेन सिंह यांच्या घरावरही हल्ला झाला. या घटनांमध्ये अनेक चर्च पाडली गेली. या बातम्या जगभर आल्याने अनेक देशांच्या संसदेमध्ये यावर चर्चा झाली. त्याचवेळी मंदिरेही पाडली गेल्याने मैतेईचाही बिरेन सिंह याच्यावर रोष वाढला. दुसरीकडे हिंसाचारही थांबत नव्हता त्यातून १३ फेब्रुवारी २०२५ या दिवशी बिरेन सिंह यांना राजीनामा द्यायला सांगून भाजपचे सरकार केंद्र सरकारने बरखास्त करून राष्ट्रपती राजवट आणली. हिंसाचार थांबण्याचे नाव घेत नसताना खूप मोठ्या प्रमाणात लष्कर आणि निमलष्करी दलांना मणिपूरमध्ये पाचारण करण्यात आले. आजही प्रत्येक ५०० फुटांवर बंदुकधारी सुरक्षादले उभी असतात. दरम्यानच्या काळात केंद्र सरकारकडून सर्व गटांशी अंतर्गत बोलणी करून समोपचाराचा काही मार्ग निघतो का, असे प्रयत्न केंद्र सरकार आणि गुप्तचर यंत्रणांनी केले, पण सततच्या हिंसाचारामुळे सर्व जमातींमध्ये एकमेकांमध्ये असलेला अविश्वास इतका मोठा होता की सर्वमान्य तोडगा निघाला नाही. त्यातूनच सरकारने ४ फेब्रुवारी २०२६ रोजी मणिपूर विधानसभा पुनरुज्जीवित करून मैतेई समाजाचे युमनाम खेमचंद सिंह यांना मुख्यमंत्री करण्यात आले, तर कुकी समुदायाच्या आमदार श्रीमती नेमचा किपगेन जी आणि नागा पिपल्स फ्रंटचे आमदार एल दिखो यांना उपमुख्यमंत्रिपद देऊन सामाजिक तसेच धार्मिक समतोल साधण्याचा प्रयत्न केला गेला, मात्र मणिपूरच्या चुराचंदपूरमध्ये नेमचा किपगेन आणि लोसी दिखो या आदिवासी समुदायाच्या आमदारांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्याच्या विरोधात मोठ्या प्रमाणात निदर्शने झाली. कुकी आणि नागांवर झालेल्या हल्ल्यांच्या निषेधार्थ त्यांनी सरकारमध्ये सहभागी होऊ नये अशी मागणी करण्यात आली. कुकीबहुल असलेल्या चुराचंदपूर जिल्ह्यात आजही हिंसाचार थांबलेला नाही. मैतेईबहुल इंफाळमध्ये तणाव असला तरी तेथे लष्करी, निमलष्करी दले मोठ्या प्रमाणात तैनात असल्याने हिंसाचाराच्या घटना कमी घडत आहेत.

राज्यांतर्गत स्थलांतर थांबावे!



उत्तरप्रदेश राज्याचा अर्थसंकल्प काही दिवसांपूर्वी विधानसभेत सादर करण्यात आला. या अर्थसंकल्पामध्ये उत्तरप्रदेशाच्या शासनाने १० लाख नोकऱ्या देण्याची घोषणा केली आहे. भारतातील एकूण इलेक्ट्रॉनिक्स घटक सिद्ध करणाऱ्या युनिट्सपैकी ५५ टक्के युनिट्स एकट्या उत्तरप्रदेशात आहेत. देशात उत्पादित होर्णाया भ्रमणभाषसंचांपैकी मोठा हिस्सा उत्तरप्रदेशात सिद्ध होत आहे. त्यामुळे उत्तरप्रदेशाला 'मॅन्युफॅक्चरिंग पॉवर हाऊस', अशी नवीन ओळख मिळाली आहे. उत्तरप्रदेशात 'एआय मिशन' स्थापना करण्याची घोषणा केली असून 'टेक युवा-समर्थ युवा' सारख्या योजनेमुळे मुलांना नवीन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. उत्तरप्रदेशातील बेरोजगारीचा दर २.२४ टक्के एवढा न्यून झाला असून राज्याची अर्थव्यवस्था ३० लाख कोटी रुपयांहून अधिक झाली आहे. उत्तरप्रदेशाच्या अर्थसंकल्पाचा येथे एवढ्या विस्ताराने विचार करण्याचे कारण, म्हणजे ते देशातील एक मोठे राज्य आहे. उत्तरप्रदेश आणि त्याच्या शेजारील राज्य बिहार येथून तेथील पायाभूत सुविधा, सोयी, नोकऱ्या यांची वानवा; उपासमारी, बेरोजगारी यांमुळे मोठ्या प्रमाणात तरुण, कष्टकरी यांचे लोंढे महाराष्ट्र, गोवा आणि दक्षिणेकडील राज्यांमध्ये येत होते. स्वतःच्या राज्यातच हाताला काम आणि पिकाला दाम न मिळाल्यामुळे हवालदिल लोक संपन्न राज्ये अन् शहरे यांच्याकडेच मोर्चा वळवत होते. एकट्या मुंबईचाच विचार करता तेथे महाराष्ट्रातून आणि अन्य राज्यांतून येणारे लोक, ते स्थायिक झाल्यानंतर येणारे त्यांचे परिवार यांमुळे मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढली. मुंबईत उत्तर भारतातील राज्यांकडून एवढ्या मोठ्या प्रमाणात लोकसंख्येचे स्थलांतर होऊ लागल्यामुळे 'लोकसंख्येचे लोंढे', असे नामाभिधान मिळाले. साहजिकच लोकसंख्या स्थलांतराचा मोठा फटका मुंबई, पुणे यांसारख्या मोठ्या शहरांना बसला आणि तेथील पाणी, वीज अशा मूलभूत गोष्टींवर ताण निर्माण झाला. झोपडपट्ट्या, अनधिकृत बांधकामे यांचे प्रमाण प्रचंड वाढले आणि त्याचाही पुन्हा ताण शहराच्या नागरी सुविधांवर पडून शहरे बकाल झाली अन् ती अनियंत्रित वाढली, म्हणजे हे लोंढे थांबवण्यापेक्षा सुविधा वाढवण्यावर भर देत राहिल्यामुळे शेवटी प्रशासनाची दमछाक झाली आणि 'हे लोंढे आता थांबलेच पाहिजेत', अशी परिस्थिती निर्माण झाली. उत्तरप्रदेशात योगी आदित्यनाथ यांचे सरकार आल्यानंतर त्यांनी 'यापुढे उत्तरप्रदेशातून कुणालाही रोजगारासाठी स्थलांतर करावे लागणार नाही', अशी घोषणा केली. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे केवळ घोषणा देऊनच थांबले नाहीत, तर त्यांनी लगोलग तशी कृती, म्हणजे शेतीसाठी अनुदान घोषित करणे, व्यवसायासाठी भांडवल उपलब्ध करून देणे, रुग्णालये, महाविद्यालये आणि विमानतळ बांधणे, अशा प्रकारे आर्थिक साहाय्य अन् पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा सपाटाच लावला. त्याचप्रमाणे सर्वांत मोठे वरदान, म्हणजे अयोध्या येथे श्रीरामाची झालेली प्राणप्रतिष्ठा! एकटी अयोध्याच उत्तरप्रदेशाचा चेहरामोहरा पालटू शकते एवढी क्षमता आहे. कोट्यवधी लोक अयोध्येला भेट देत असल्यामुळे त्यांच्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे आणि त्यातून राज्याला मोठ्या प्रमाणात महसूल उत्पन्न होणे, अशा एका मंदिरावर आधारित अर्थव्यवस्थेने तेथे आकार घेतला आहे. अयोध्येसह काशी आणि मथुरा येथेही लोक भेटी देत असल्यामुळे उत्तरप्रदेशाच्या विकासात त्यांचेच मोठे योगदान आहे, यात शंकाच नाही. काही दिवसांपूर्वी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी एका कार्यक्रमात सांगितले, 'विदर्भातील तरुणांना मुंबई-पुण्याकडे जावे लागू नये.' गडकरी यांच्या मते गावेच समृद्ध केली, तर गावातील लोक शहरांकडे जाणार नाहीत. गावातील तरुणांना गावातच काम मिळून, म्हणजेच कृषी आधारित उद्योगांवर भर देऊन गावातच उद्योगधंदे उभारले पाहिजेत. गावातच शाळा, महाविद्यालय, रुग्णालय, इंटरनेटची व्यवस्था झाल्यास यासाठी शहरांवर अवलंबून रहाणे टळेल. राज्यांतर्गत स्थलांतर टाळण्यासाठी हे उपायही केले पाहिजेत. राज्यातील निवडणुकांचाच विचार केला, तर आमदार, खासदार यांपेक्षा ग्रामपंचायत निवडणुकांना अधिक महत्त्व असते. गावातील सरपंचपद हे नगराध्यक्ष, आमदार या पदांहून मोठे आहे, अशी ग्रामीण जनभावना आहे. त्यासाठी पुष्कळ खर्चही केला जातो. हाच विचार मूलभूत सोयी-सुविधांच्या संदर्भात केला, तर मात्र त्या गावात केल्या जात नाहीत. परिणामी तरुण स्वतःचे भविष्य, गृहस्थ त्याच्या मुलांचे चांगले भविष्य यांचा विचार करून शहराकडे वळतो. शहरातील अगदी घराच्या जवळ असणाऱ्या सुख-सुविधा लोकांना हव्याहव्याशा वाटतात. त्या सुविधा त्यांना गावात मिळत नसल्यामुळे आणि चांगले जीवनमान जगण्याची गावात शाश्वती नसल्यामुळे ते शहरांकडे वळतात. परिणामी गावेच्या गावे ओस पडतात. केवळ सण-उत्सवांपुरते किंवा काही दिवस सुटीसाठी म्हणून लोक गावातील घरी येतात आणि काही दिवसांनंतर पुन्हा निघून जातात. काही लोक निवृत्तीपर्यंत शहरात थांबणे पसंत करतात आणि निवृत्तीनंतरचे जीवन शुद्ध हवा, पाणी मिळून जगता यावे म्हणून गावी येतात; मात्र गावात आरोग्यसुविधांची न्यूनता आणि अनेक घरे रिकामी असल्यामुळे त्यांना इच्छा असूनही सध्या रहाता येत नाही. परिणामी तेही काही दिवस गावी वास्तव्य करून पुन्हा शहरात जातात. शहरांकडे येणारे लोंढेच्या लोंढे रोखण्यासाठी गावातच चांगली शाळा, महाविद्यालये आणि आरोग्यसुविधा निर्माण केल्या पाहिजेत. शहरातील आरामदायी आणि सुख-सुविधांयुक्त जीवन जगता येण्यासाठी राज्याच्या ग्रामीण भागांतील लोक त्यांच्या भूमी विकून येतात, परिणामी ते भूमीहीनही होतात. त्यामुळे शेतीआधारित लघुउद्योग गावातच होणे आवश्यक आहे. आपल्याकडे १२ बलुतेदार पद्धत पूर्वीपासूनच होती. गावाच्या आवश्यकता गावातच पूर्ण केल्या जायच्या. एखाद्या मोठ्या कामासाठीच एका गावातून दुसऱ्या गावात किंवा नगरांमध्ये प्रवास करावा लागे. विविध कौशल्ययुक्त व्यक्ती गावातच असल्यामुळे लोकांची कामे होतात आणि रोजगारही उपलब्ध होतो. त्यामुळे गावही समृद्ध होते आणि स्थलांतर होत नाही. यातून गावाचा विकासही साध्य होतो. वाढत्या शहरीकरणासाठी सहस्रो कोटी रुपये शहरांवर व्यय केले जातात. परिणामी ग्रामीण जनता शहरांकडे आशाळभूतपणे पाहून तेथेच जाण्याचा पर्याय निवडते. गावात मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठीही अर्थसंकल्पात प्रावधान करून त्याप्रमाणे पैसा व्यय केल्यास निश्चितपणे गावकरीही करांच्या रूपात महसूल मिळवून देऊ शकतात. 'स्मार्ट सिटी'पेक्षाही 'स्मार्ट व्हिलेज' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याची आवश्यकता आहे, तरच खऱ्या अर्थाने गावे, शहर आणि राज्य यांचा विकास होऊ शकतो!

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (बी) विरार पूर्व

मुख्य कार्यालय - विरार

दुरध्वनी - ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३

जावक क्र. वविशम /कर/२५०/२०२५-२६

दिनांक - २४/०२/२०२६

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकाच्या प्रकरण परत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भात कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय विभागीय कार्यालय विरार येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यतः करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	मालमत्ता क्र.	पावती क्र.	ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-याचे नाव किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव	खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन नाव
1	NL02/1045/44	ASS/26412	सोनी सभाजीत पाण	ज्ञानदेव चिंतामणी
2	NL02/800/8	ASS/26399	रिता एम. श्रीवास्तव	नसीरुन निशा नसीम अहमद
3	NL02/913/15	ASS/26400	दिलीप एस. गिरी	लालबहादूर रामरुम चौहान
4	NL02/913/25	ASS/26398	दिलीप एस. गिरी	लालबहादूर रामरुप चौहान
5	NL02/412/67	ASS/26415	शंकर नरसू बंगेरा	आफरीन फातिमा मोहम्मद इस्तेखार खान
6	NL02/654/49	ASS/26416	अजय कुमार गुप्ता / ललिता देवी गुप्ता	सुमित कुमार
7	NL02/614/57	ASS/26414	विनय ए. सिंह	लाखन सिकेन्द्रा सह
8	NL02/809/47	ASS/26395	अशोक ए. सिंह	जयप्रकाश रीशीदेव गुप्ता
9	NL02/627/2	ASS/26381	निरज कण्हेयालाल बरनवाल	अनुप घनश्याम सिंह
10	NL02/1051/89	ASS/26373	कलावती लालचंद तिवारी	अनुराग लालचंद्र तिवारी
11	NL02/940/170	ASS/26385	रमील एस. दवे	नीता मदन सोनी
12	NL02/181/26	ASS/26382	अजीम मोहम्मद जान मोहम्मद शेख / मेहताब आलम नुरहुलहुदा चौधरी	ताहेरा खातून मोहम्मद मुजम्मिल अंसारी
13	NL02/549/30	ASS/26392	मो. जे. आरीफ	मोहम्मद मुजम्मील मोहम्मद मुतुर्जा अंसारी
14	NL02/594/7	ASS/26376	मो. अनवर मो. आजम खान	अलाउद्दीन s/o बदरुद्दीन
15	NL02/628/5	ASS/26391	असफाक अहमद अंसारी	मीणा देवी बालकिशुन मंडल
16	NL02/521/5	ASS/26390	संतोष माणिक मोहिते	फरहीन रिजवान शेख
17	NL03/645/56	ASS/26389	ज्योती बजाज	रुपेश गुरुनाथ पाटील
18	NL03/1123/57	ASS/26375	चंद्रिका शंकर नाईक	धनजी देवाजी मकवाना / सोनी धनजी मकवाना
19	NL02/719/42	ASS/26393	साई माऊली इंटरप्राइजेस	सुलेखा नकुल धारा / नकुल तारक धारा
20	NL02/501/8	ASS/26402	शिवनारायण मिश्रा	रुपेश हरिश्चंद्र देसाई

सही /-

सहा. आयुक्त

प्रभाग समिती (बी) विरार पूर्व

वसई-विरार शहर महानगरपालिका

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार,२४ फेब्रुवारी २०२६ ते २ मार्च २०२६

मुंबईतील रस्ते कामांची पालिका आयुक्तांकडून झाडाझडती

रस्त्यांची ६३ टक्के कामे पूर्ण



मुंबई, खड्डेमुक्त मुंबईसाठी मुंबईतील रस्ते सिमेंट काँक्रीट करण्यावर पालिका प्रशासनाने भर दिला आहे. सिमेंट काँक्रीटीकरण टप्पा १ अंतर्गत निर्धारित उद्दिष्टांपैकी ७७ टक्के कामे पूर्ण झाली आहेत, तर टप्पा २ अंतर्गत ५२ टक्के कामे पूर्णत्वास गेली असून एकूण मिळून ६३ टक्के कामे यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहेत. पुढील रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण कामे करताना रस्तेनिहाय सूक्ष्म नियोजन करावे. हाती घेतलेला रस्ता, खोदण्यात आलेला रस्ता निश्चित केलेल्या कालमर्यादेत पूर्ण करावा, असे स्पष्ट निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले आहेत. काँक्रीटीकरण कामे करताना लोकप्रतिनिधींसमवेत संवाद साधावा, त्यांना इत्यंभूत माहिती द्यावी, त्यांचा प्रतिसाद मिळवावा, असे निर्देश गगराणी यांनी दिले आहेत. मुंबईच्या पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी महत्त्वाकांक्षी सिमेंट काँक्रीटीकरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. टप्पा १ आणि टप्पा २ अंतर्गत शहर आणि उपनगर भागात काँक्रीटीकरण कामे सुरू आहेत. या कामांचा महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर, उप आयुक्त गिरीश निकम, प्रमुख अभियंता मंतय्या स्वामी यांच्यासह संबंधित अभियंते उपस्थित होते.

रस्ते काँक्रीटीकरण प्रकल्पामुळे रस्ते प्रवास अधिक सुरक्षित, सुकर आणि जलद होणार आहे. काँक्रीट रस्त्यावर पावसामुळे खड्डे होण्याचे प्रमाण अत्यल्प राहते, परिणामी देखभाल आणि परिरक्षणाचा खर्चही मोठ्या प्रमाणावर वाचतो. मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेला आधुनिक, सुरक्षित आणि सुयोग्य स्वरूप देण्याच्या दृष्टीने रस्ते काँक्रीटीकरण प्रकल्पाची अंमलबजावणी हा एक ऐतिहासिक टप्पा ठरला आहे. महापालिकेच्या महत्त्वाकांक्षी रस्ते सिमेंट काँक्रीटीकरण प्रकल्पाच्या टप्पा १ आणि टप्पा २ अंतर्गत १० फेब्रुवारी अखेर एकूण १५९४ रस्त्यांचे मिळून ४३०.६९ किलोमीटर लांबीचे काँक्रीटीकरण पूर्ण करण्यात आले आहे. टप्पा १ अंतर्गत निश्चित केलेल्या उद्दिष्टापैकी ७७ टक्के तर, टप्पा २ अंतर्गत निश्चित केलेल्या उद्दिष्टापैकी ५२ टक्के लक्ष्यपूर्ती करण्यात आली आहे. म्हणजेच टप्पा १ आणि टप्पा २ असे एकत्रित मिळून पूर्ण झालेल्या कामांची टक्केवारी ६३ इतकी आहे, असे गगराणी यांनी सांगितले. रस्ते कामात अभियंत्यांची प्रत्यक्ष हजेरी अनिवार्य काँक्रीटी रस्त्यांची अंमलबजावणी सुरू असताना अभियंत्यांनी प्रत्यक्ष कार्यस्थळी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. कामे सुरू करताना कामाच्या गुणवत्तेत विशेष लक्ष द्यावे, गुणवत्तापूर्ण काम करणे म्हणजे केवळ रस्त्याचा पृष्ठभाग चांगला असणे नव्हे तर, त्याच्या बेस लेवलपासून प्रत्येक स्तरावर मानकाप्रमाणे सर्व घटकस्तर व त्याच्याशी संबंधित आर्द्रता, तापमान इत्यादीसह तांत्रिक निकष तंतोतंत पाळले जाणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे अभिजित बांगर यांनी सांगितले. पावसाळ्यापूर्वी महत्त्वाचा टप्पा गाठा भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या तज्ज्ञांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे काँक्रीटीकरण कामे अधिक गुणवत्तापूर्ण होत आहेत, असा प्रतिसाद सहायक अभियंत्यांनी दिला आहे. विद्यमान सत्र संपण्यापूर्वी ९० दिवसांचा कालावधी हातामध्ये आहे. या ९० दिवसांचे सूक्ष्म नियोजन केले तर पावसाळ्यापूर्वी काँक्रीटीकरण प्रकल्पाचा महत्त्वाचा टप्पा गाठता येऊ शकतो, असे बांगर यांनी नमूद केले.

मुंबईतील फेरीवाल्यांची खैर नाही

महापालिकेचा आतापर्यंतचा सर्वात कडक निर्णय, महापौरांचा थेट इशारा



मुंबई । मुंबई महानगरपालिकेतून वितरित करण्यात आलेल्या २३७ बोगस जन्मप्रमाणपत्रांच्या मुद्द्यावरून मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. मुंबई महापालिकेने ही प्रमाणपत्रे रद्द केली आहेत. पण तरीही अजूनही ती प्रमाणपत्रे अनधिकृत बांगलादेशी घुसखोरांच्या ताब्यात कशी? असा संतप्त सवाल रितू तावडे यांनी उपस्थित केला आहे. या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई न झाल्यास थेट सभागृहात प्रस्ताव आणण्याचा इशारा महापौरांनी दिला आहे. मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी नुकतंच पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांना मुंबईतील फेरीवाल्यांवर कशाप्रकारे कारवाई केली जाणार आहे अशा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली. मुंबईतील फुटपाथवर व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक फेरीवाल्याची आता कठोरपणे तपासणी केली जाणार आहे, असे रितू तावडे यांनी म्हटले. आतापर्यंत २३७ बोगस जन्मप्रमाणपत्र मुंबई महापालिकेने दिले आहे. हे जन्मप्रमाणपत्र त्यांनी रद्द केले आहेत. पण जे ओरिजनल जन्मप्रमाणपत्र अनधिकृत बांग्लादेशींकडे आहेत, ते अजून त्यांच्याकडून घेण्यात आलेले नाही. जर मुंबई महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी कारवाई केली नाही, तर त्यांच्याविरुद्ध सभागृहात प्रस्ताव आणावा लागेल. बांग्लादेशींना सांभाळण्याचे काम जर मुंबई महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून होत असेल, तर आम्हाला कडक कारवाई करावी लागेल, असा कडक इशारा रितू तावडे यांनी दिला.

मुंबईतील फेरीवाल्यांवर कशाप्रकारे कारवाई होणार?

तसेच मुंबईत जे कोणी फेरीवाले, फुटपाथवर बसतात, त्या सर्वांचे जन्मप्रमाणपत्र आम्ही चेक करणार आहोत. ती मोहीम आम्ही जोरदार हातात घेणार आहोत. त्यामुळे जे कोणी फेरीवाले आहेत त्यांचे जन्मप्रमाणपत्र कठोर पद्धतीने चेक केले जाणार आहेत. यावर कोणतीही माफी केली जाणार नाही, असे रितू तावडे यांनी सांगितले.कारण हा देशद्रोहाचा प्रकार आहे. तसेच ज्या कोणत्या बांग्लादेशींना सांभाळण्याचे काम अधिकारी करत असतील त्यांच्यावरही कारवाई केली जाईल. हे करत असताना आम्ही प्रत्येक फेरीवाल्याचे जन्मप्रमाणपत्र, आधार कार्ड हे चेक केले जाईल, असेही रितू तावडे म्हणाल्या.

अनधिकृत हातभट्ट्यांवर पोलिसांची मोठी कारवाई



वसई। नायगाव परिसरात सुरू असलेल्या बेकायदेशीर हातभट्ट्यांवर नायगाव पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने रविवारी धडक कारवाई केली. कामण येथील बेलकडी जंगल भागात टाकण्यात आलेल्या छाप्यांमध्ये दोन अवैध दारूभट्ट्या उद्ध्वस्त करण्यात आल्या असून, या प्रकरणी तीन व्यक्तींविरोधात नायगाव पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईत लाखोंचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, बेलकडी जंगल परिसरात राजेश हडळ हा बेकायदेशीररीत्या गावठी दारू तयार करत असल्याचे समोर आले. त्यानुसार पोलिस पथकाने छापा टाकत एका दारूभट्टीवर कारवाई केली.

यावेळी सुमारे ३०० लिटर तयार गावठी दारू, २४०० लिटर नवसागर मिश्रित तयार गुळाचा नाशवंत वॉश, १४ रिकामे ड्रम तसेच भट्टीसाठी लागणारे लाकुड जप्त केले. याच जंगल परिसरात काष्टीच्या नाल्याजवळ चंद्रकांत खरपुडे व संतोष मलाचकर हे दारू निर्मिती करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्या ठीकाणीही छापा टाकून एक हातभट्टी उद्ध्वस्त करण्यात आली. या कारवाईत अंदाजे २५० लिटर गावठी दारू, ३२४० लिटर नाशवंत वॉश, एक डोल, १८ रिकामे ड्रम, भट्टीसाठी लागणारे लाकूड आणि दोन प्लास्टिकचे कॅन जप्त करण्यात आले.

दोन्ही कारवायांमध्ये एकूण ३ लाख ६७ हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही यशस्वी कारवाई सपोनि गणेश केकान, ज्ञानेश्वर आसबे, शेखर पवार तसेच सचिन मोहिते, चेतन ठाकरे, सचिन खंताळ, अमर पवार, अशोक पाटील आणि पांडुरंग महाले यांच्या पथकाने पार पाडली.

अवैध हातभट्टी व्यवसायामुळे परिसरात गुन्हेगारी, आरोग्यधोके आणि सामाजिक अस्थिरता वाढत असून अनेक कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त होत आहे. अशा बेकायदेशीर व्यवसायांवर वेळोवेळी कठोर कारवाई करणे गरजेचे असून पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे अवैध दारू व्यवसायीकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

चार जण जखमी, एकाचा भयंकर मृत्यू



मुंबई । मुंबई मेट्रोचे बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी मोठा अपघात झाला आहे. मेट्रो स्टेशनच्या पिलरमधील सिमेंटचा भाग उंचावरुन खाली कोसळल्याने दुर्घटना घडल्याचे समोर आले आहे. पूर्व उपनगरातील मुलुंड येथे पिलरचा भाग एका रिक्षावर कोसळून तीन ते चार जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. यावेळी बघ्यांची मोठी गर्दी घटनास्थळी जमा झाली. मेट्रोचा पिलर खाली कोसळून झालेल्या अपघातानंतरचा अंगावर काटा आणणारा व्हिडिओ समोर आला आहे.

नेमकं काय घडलं?

मुलुंड येथे मुंबई मेट्रोचे बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी सिमेंटच्या पिलरचा भाग कोसळला. शनिवार १४ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.१५ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. मुलुंड पश्चिम भागातील लाल बहादूर शास्त्री रोडवर जॉनसन अँड जॉनसन कंपनीच्या जवळ मुंबई मेट्रोचे बांधकाम सुरु असताना हा प्रकार घडला.

कसा झाला अपघात?

एलबीएस मेट्रो स्थानकाच्या बांधकामादरम्यान सिमेंटच्या खांबाचा एक भाग कोसळून खालून जाणाऱ्या रिक्षावर पडला. यावेळी रिक्षातून प्रवास करणारे चालकासह तीन ते चार जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. अग्निशमन दल, पोलिस, मेट्रो कर्मचारी, वॉर्ड कर्मचारी आणि १०८ रुग्णवाहिका सेवा तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. रिक्षा पिलरखाली दबल्यामुळे एक जण काही काळ अडकून पडला होता. मात्र अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने स्लॅब हटवून जखमींना रुग्णालयात दाखल केले. यावेळी घटनास्थळी मोठी गर्दी जमा झाल्याचं पाहायला मिळालं.

मेट्रो मार्ग चारवर अपघात

मुंबई मेट्रो ४ या वडाळा-घाटकोपर-मुलुंड-कासारवडवली मार्गे जाणाऱ्या ग्रीन लाइनवरील स्टेशनच्या बांधकामावेळी हा अपघात झाला आहे. ३२.३२ किमीचा एलिवेटेड कॉरिडोअर मुलुंडसह भांडुप, कांजुरमार्ग या एलबीएस रोडवरील स्थानकांची कनेक्टिव्हिटी वाढवत मुंबईतील महत्वपूर्ण व्यावसायिक भागांशी जोडेल. यामुळे मुंबई लोकलवरील ताण कमी होणार आहे. तसेच प्रवासाचा वेळ ६०-७५ मिनिटांवरून ३०-४० मिनिटांपर्यंत कमी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका
प्रभाग समिती " एफ " धानिव/पेल्हार
ता.वसई, जि. पालघर ४०१ २०८

ईमेल - pelharbvvcmc@gmail.com
जा. क्र. वविशम/प्रसएफ/कर.वि./३०४/२०२५-२६
दिनांक -२०/०२/२०२६

जाहिर नोटिस

वसई विरार शहर महानगरपालिका सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, खालील नमुद मिळकत बिलालपाडा विभागातील मालमत्ता धारकांनी हस्तांतरण कामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे सादर केली आहेत. उक्त फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत / तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून सात (७) दिवसांच्या आत लेखी हरकत / तक्रार कागदपत्रांसह नोंदवावी. सदर हरकत/तक्रार न आल्यास कार्यालय पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

अ.क्र.	विभाग	नविन मा. क्र.		ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजेच विकणा-याचे किंवा करदात्याचे नाव	खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
		वॉर्ड क्र.	मा. क्र.		
१	बिलालपाडा	१३	५६५६	गंगाप्रसाद अभयराज पाण्डेय	सालिक टेंगरी साहु व इतर २
२	बिलालपाडा	०८	२४६/२	गिरजा शंकर मन्सुरी	किशनसिंह रामसिंह कडेचा / लक्ष्मणसिंह उदयसिंह दसाणा
३	बिलालपाडा	१३	१२७९२/३	मोहम्मद अमिन मन्सुरी	शाह आलम S/O मोहम्मद अमीन
४	बिलालपाडा	०२	१०५२	अबुबकर अली रजा	रियाज निसार अहमद
५	बिलालपाडा	१३	१८४३४/१	इंदु देवी यादव	रेखा राकेश मिश्रा
६	बिलालपाडा	१३	२०९९१	संतोषकुमार हरी प्रसाद गौंड	विकी कमला जैसवाल
७	बिलालपाडा	१०	२७४०	अजयकुमार राजबहादुर मौर्या	मीता राजाराम पाल
८	बिलालपाडा	०८	१८०६/५९	शेरुबहादुर शिवहरख यादव	विकास कुमार रामआसरे चौबे
९	बिलालपाडा	०१	१११६	सलाउद्दीन रहमतुल्लाह इद्रीस	रामधीन रामनिवास प्रतापती
१०	बिलालपाडा	०७	७४१४	लालचंद हरी पाल	दशरथ पाचुराम गुप्ता
११	बिलालपाडा	०१	५०१८	बबलेश कुमार / राजु जयशंकर दुबे	मनिष यादव
१२	बिलालपाडा	१३	८९२७	ओमप्रकाश अच्छेलाल गुप्ता	हसरुद्दीन अलिरजा शाह
१३	बिलालपाडा	१०	९२९/१	सुभाषचंद्र बटुकराम गुप्ता	धीरेंद्र कुमार / शनि यादव S/O राजेंद्र प्रसाद
१४	बिलालपाडा	१३	३१००/१	मंन्जुर अहमद आस मोहम्मद शेख	आमिर मंजूर अहमद शेख
१५	बिलालपाडा	१३	१६३८१	मोहम्मद इब्राहीम अब्दुल मोतीन सय्यद	खान अब्बास अली
१६	बिलालपाडा	१३	१२६६९	मुस्ताफ अहमद शाहदुल्लाह खान	सुनील राजेश भारती
१७	बिलालपाडा	०३	८८६/२	राजिवकुमार अमरनाथ मिश्रा	हसीना साहेब अली (विभक्त ४०० चौफु पैकी २०० चौफु)
१८	बिलालपाडा	१३	३१९०/२५	विनायक विष्णु मेजारी	संजय नारायण आग्रे
१९	बिलालपाडा	१०	१२४०/१	जगन्नाथ रामबरन विश्वकर्मा	शुभम काशीराम विश्वकर्मा
२०	बिलालपाडा	०८	१६०१	रामधनी राममनोहर चौरसिया / मधुलता रा.चौरसिया	सुशील जंगबहादुर कनौजिया
२१	बिलालपाडा	१३	१११३९/२	मोहम्मद इस्लाम मोहम्मद इदरिशी मन्सुरी	मुस्ताक अंसारी

(XXXXXXX)
सहा. आयुक्त
प्रभाग समिती "एफ "धानिव/पेल्हार
वसई विरार शहर महानगरपालिका

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com